# सणस विद्यालयात 'फ्लायिंग यंगस्टर्स'

धायरी : क्विक हिल फाउंडेशन व पंख संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या शाळांगण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या नारायणराव सणस विद्यालयातील विद्यार्थ्यांचा ठामपणा, संघटन कौशल्य, नेतृत्वगुण अशा विविध गुणांचा शोध घेऊन त्यांचा गट बनविण्यात आला व या गटाला फ्लायिंग यंगस्टर, असे नाव देण्यात आले. या गटातील मुलांमध्ये उपजत गुणांचा व ऊर्जेचा योग्य ठिकाणी वापर करून त्याद्वारे मुलांना जबाबदार पाल्य, जबाबदार विद्यार्थी व देशाचा जबाबदार नागरिक बनविण्यासाठी प्रोत्साहित करणे असा गट निवडीमागील उद्देश आहे.

कार्यक्रमाचे नियोजन शाळांगण समुपदेशक कौस्तुभ जोगळेकर, श्वेता सूर्यवंशी व मृणाल मापुस्कर यांनी केले. कार्यक्रमासाठी क्विक हिल कंपनीचे सी.एस.आर. प्रमुख अजय शिर्के, पंख संस्था प्रमुख स्मिता आपटे, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक प्रकाश सबनीस, पर्यवेक्षिका उर्मिला पाटील, पर्यवेक्षक संभाजी पाटील, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.